# प्रकरण - चौथे

# हमीद दलवाई यांच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण आणि समकालीन प्रस्तुतता

# प्रकरण - चौथे

# हमीद दलवाई यांच्या विचारांचे टीकात्मक परीक्षण आणि समकालीन प्रस्तुतता

विचारांना बुद्धीच्या आणि तर्काच्या कसोटीवर तपासून घेतल्यास विचारांतील अनेक दोष टाळता येतात. जेव्हापासून बुद्धीप्रामान्यवादाचा जन्म झाला चांगल्या गोष्टी कोणत्या, वाईट गोष्टी कोणत्या याबद्दल मनुष्य सारासार विचार करू लागला तेव्हापासून आजमीतीपर्यंत अनेक विचारांचा तत्त्वज्ञानाचा जन्म झाला. कोणतीही विचारधारा घ्या त्यामध्ये समाजात मतभेद निर्माण होतात. मतभेद निर्माण व्हावे परंतु ते विचारांचे मतभेद असावे. कारण, या मतभेदाच्या विचारमंथनातूनच नव्या विचारांचा नविन दृष्टीकोनातून जन्म होतो. प्रतिगामी विचारपरंपरेच्या टीकेतून आजतागायत कोणताही पुरोगामी विचारवंत सुटलेला नाही. हमीद दलवाई यांची मांडणी बुद्धीप्रामान्यवादी होती. त्यांनी प्रतिगामी मतप्रवाहांवर, परंपरावाद्यावर कडक टीका केली. हमीद दलवाई यांचा नवा दृष्टीकोन हिंदू-मुस्लिम दोन्ही सनातनी मंडळींच्या पचनी पडला नाही. मागील प्रकरणामध्ये हमीद दलवाई यांनी स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये घडलेल्या मुस्लिम राजकीय स्थित्यंतराचा सविस्तर आढावा घेतला गेला. मुस्लिम समाजात प्रामुख्याने १८५७ नंतर धार्मिक पुनरूत्थानवादी चळवळी झाल्या याचा थोडक्यात आढावा घेतला गेला. हिंदु-मुस्लिम वाढता जमातवाद आणि ब्रिटिशांच्या भेदनितीवरही प्रकाश टाकण्यात आला. फाळणीसाठी कारणीभूत ठरलेले घटक आणि भारत-पाकिस्तान फाळणीमध्ये मुस्लिम जातीवाद्यांची आणि सुशिक्षित मुस्लिमांच्या भूमिकेच्या आढाव्या बरोबर हमीद दलवाई यांचे धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे विचार आणि त्यांनी हिंदूराष्ट्रवादाची केलेली चिकित्सा या सर्व घटकांचा आढावा घेतलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणामध्ये हमीद दलवाई यांचे मांडणीचे स्वरूप कसे होते, धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची त्यांची भूमिका काय होती? त्यांनी दिलेल्या एकूण विचारावरील विरोधी मतप्रवाहांची मते लक्षात घेवून हमीद दलवाई यांच्या विचारांची समकालीन प्रस्तुतता काय आहे इत्यादी घटकांचा आढावा घेतलेला आहे. हमीद दलवाई यांच्या विचरांच्या विरोधी मतप्रवाहांना अभ्यासण्यापूर्वी हमीद दलवाई यांच्या मांडणीच्या वैशिष्ट्याला जाणून घेतले पाहिजे.

**हमीद दलवाई यांच्या विचारांच्या मांडणीची वैशिष्टये :**

हमीद दलवाई यांची विचार मांडणी यापूर्वीच्या अनेक मुस्लिम विचारवंताच्या मांडणीपेक्षा वेगळी आहे. त्यांची मांडणी 'बुद्धीप्रामान्यवादी' आहे. धर्मग्रंथावर आधारलेली नाही. दलवाई धर्मग्रंथाचे विश्लेषण बदलत्या काळानुरूप वैज्ञानिक दृष्टीकोनातून व्हावे अशी भूमिका मांडतात. बदलत्या काळानुसार समाजाला बदलाचे अनेक नवे दृष्टीकोन स्वीकारावे लागतात. धर्माच्या शब्दांनाच चिकटून न बसता वैज्ञानिक दृष्टीकोनातून धर्मग्रंथाकडे पाहणे गरजेचे असते. मुस्लिम समाज इस्लामला परिपूर्ण समाज मानतो. धर्मचिकित्सेच्या विरोधी भूमिका ते घेतात. हमीद दलवाईंचे वेगळेपण नक्की याच ठिकाणी आहे. धर्मग्रंथ व धर्माकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन शब्दप्रामान्यवादी (धर्मग्रंथावर आधारित) नसून बुद्धीप्रमाण्यवादी आहे.

हमीद दलवाई लोकशाही शासन व्यवस्थेचे समर्थन करतात. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व, न्याय या लोकशाही मूल्यांचे ते क्रांतीकारी समर्थक हाते. 'धर्मसहिष्णूता' हे तत्व वरील लोकशाही आदर्श मूल्याइतकेच त्यांना प्रिय वाटत होते. दलवाई यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य असे की, ते अत्यंत प्रखर असे पुरोगामी व धर्मनिरपेक्षतावादी राष्ट्रभक्त होते. संविधानामध्ये ग्रंथीत केलेल्या धर्मस्वातंत्र्याचे ते समर्थक होते. आणि दुसरीकडे ते स्वत: ईहवादी होते. यातच त्याचे वेगळेपण आहे.

"भारतामध्ये आधुनिकतेवर भर दिला गेला, नागरी स्वातंत्र्य व कायद्याचे राज्य कटाक्षाने पाळले गेले, लोकशाही प्रणालीला निष्ठा अर्पण केली व नागरिकांनी धर्मस्वातंत्र्य पाळूनही राज्य व धर्म अलग ठेवले तर बहुसंख्य, अल्पसंख्य हा प्रश्न निश्चित संपेल."[१]

हमीद दलवाई यांनी धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची मांडणी केली. ती करत असताना धर्म आणि राज्य संस्था या दोन भिन्न बाबी मानल्या. हिंदु-मुस्लिम प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी एकमेव उपाय म्हणजे भारतीय धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेच्या प्रवाहाशी राष्ट्रीय प्रवाहाशी मुस्लिम समाजाने समरस व्हावे अशी भूमिका त्यांनी घेतली. भारतीय मुसलमांनाबद्दल ते म्हणतात की, "भारतीय मुस्लिमांनी हे ओळखावे की त्यांची भूमिका विजेत्यांची वा पराजितांची नसून भारतीय नागरिकांची आहे. आणि इतर नागरिकांच्या बरोबरीची आहे. त्यामुळे एकाच कायद्याने आमचे जीवन नियंत्रित होणे गरजेचे आहे."[२]

भारताची उभारणी भारतीय संविधानात तरतूद केलेल्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाच्या तत्वाप्रमाणे व्हावी. तसेच भारताची राष्ट्रीयता धर्मनिरपेक्ष असली पाहिजे. शासनाचे व्यवहार नि:पक्षपातीपणाचे असले पाहिजे. जात, धर्म, पंथ, वंश या आधारावर शासनाने भेदभाव करू नये. भारताची भाषा सामुहिक सहिष्णूता जपणारी असली पाहिजे. तसेच भारतीय मुसलमानांची अस्मिता भारतीय असली पाहिजे. भाषा व धर्म यांचा कोणताही संबंध नाही. उर्दू ही मुसलमानांची भाषा असती तर जगामध्ये जितके मुस्लिम राष्ट्रे आहेत त्या सर्व ठिकाणी उर्दूचा वापर दिसला असता भारत व भारतीय उपखंडाशिवाय उर्दू ही भाषा कुठेही बोलली जात नाही. म्हणून उर्दू ही भाषा मुसलमानांची भाषा होत नाही. महाराष्ट्रातील भाषा मराठी आहे. म्हणून महाराष्ट्रातील मुसलमानांची भाषा मराठीच असली पाहिजे. शाळा मराठीतून असाव्या. मुसलमानांनी उर्दूचा आग्रह धरू नये. उर्दू भाषा ही उत्तर भारतीयांची भाषा आहे. उर्दूतून शिक्षण घेतलेल्यांना नोकरीच्या समस्या येतात. असे दलवाई यांना भाषेबद्दलही सुचवायचे होते.

धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद हे सर्व धार्मिक लोकांना धार्मिक स्वातंत्र्याची हमी आहे. धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद धर्मसुधारणेला विरोध करत नाही. आज समाजाला न्याय वाटणाऱ्या प्रथा परंपरा उद्याच्या समाजाला न्याय वाटतीलच असे नाही. कारण बदलत्या काळात न्याय या कल्पना बदलत जातात. न्यायाचा आशय अधिक दृढ होत जातो. राजाराम मोहन रॉय यांनी हिंदू समाजातील सतीप्रथा बंद करण्यासाठी परिश्रम घेतले. सतीप्रथा बंद केल्याने सनातनी हिंदूंचा त्यावेळीही विरोध झाला आणि १९५५ मध्ये 'हिंदू कोड बील' लाही सनातनी मंडळींनी विरोध केला मग सतीप्रथा आजच्या समाजाला न्याय वाटेल का? न्याय वाटणार नाही कारण सामाजिक सुधारणेचा एक भाग म्हणून काळाच्या ओघात कालबाह्य प्रथांना दिलेला हा छेद आहे. अशा धर्माच्या नावाने पाडलेल्या कालबाह्य प्रथा, परंपरा बदलत असताना धर्मनिरपेक्ष राष्ट्रवाद त्याच्या आड येत नाही. दुर्दैवाने मुस्लिम समाजामध्ये काही पुरोगामी बदल करावयाचे असतील मग ते स्त्रियांच्या हक्काची पोटगी, असो, जूबानी तलाक असो अथवा समाननागरी कायदा असो मुस्लिम धर्मांधाना ती सुधारणा म्हणजे धर्मातील लुडबूड वाटते. मुस्लिम समाजाची ही खरी शोकांतिका आहे. याचा अर्थ सर्वच मुस्लिम प्रतिगामी आहेत असे नाही. आज मुस्लिम समाजामध्ये बराच बदल आढळतो. सुप्त का होइना दबक्या आवाजात सुधारणांची मागणी होताना दिसते. अनेक संघटना, हिंदू-मुस्लिम समाजातील पुरोगामी मंडळी झटताना दिसतात. दलवाई मुस्लिम समाजामध्ये समान सुधारणेचे कायदे व्हावेत अशी मागणी करतात. धर्मनिरपेक्षतेच्या आधारे त्यास विरोध होवू नये कारण समाजसुधारणेस धर्मनिरपेक्षता कोणताही अडथळा आणीत नाही.

"अर्धशतकाच्या काळात काँग्रेस पक्ष सर्वात जास्त काळ सत्तेवर होता. पण त्या पक्षाच्या सरकारांनी या प्रश्नाकडे कधीही गांभीर्याने पाहिले नाही. मुस्लिम मतांकडे नजर ठेवून त्यांनी धर्मवादी प्रवृत्तींशी तडजोड करत आपल्या घटनादत्त कर्तव्याशी आणि आधुनिक मानवी मूल्यांच्या बांधिलकीशी प्रतारणा केली. १९८५ साली शाहाबानू

प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे मुस्लिम स्त्रीला काही हक्क आणि स्वैर घटस्फोटांपासून मुक्ती मिळाली होती, पण मुस्लिम सनातन्यांनी विरोधाचे रान उठविल्यामुळे त्या वेळचे पंतप्रधान दि. राजीव गांधी यांनी सनातनी मुस्लिम नेत्यांसमोर सपशेल शरणागती पत्करून सर्वोच्य न्यायालयाचा निर्णय रद्दबातल करणारा कायदा आपल्या पक्षाच्या बहुमताच्या जोरावर मंजूर करून घेतला. त्यामुळे मुस्लिम समाजामधील सनातनी उलेमांचा पाश अधिकच आवळला गेला आणि संघ परिवाराच्या हातात मुस्लिम समाजाच्या विरोधाचे आणखी एक हत्यार आयतेच मिळाले.''[३]

हमीद दलवाई प्रतिगामी शासनकर्ते आणि सनातनी मंडळींचा म्हणून समाचार घेतलेला आहे कारण धर्मनिरपेक्ष राष्ट्रीय एकात्मता आणि मुस्लिम समाजाच्या आधुनिकतेमध्ये दलवाई यांना ही प्रतिगामी प्रवृत्ती मुख्य अडसर वाटत होती. ''हिंदू धर्मातील सनातनीपणा इस्लाम मधील सनातनीपणाला आधार देत असतो, टिकवून ठेवीत असतो. हिंदूंनी आपला सनातनीपणा नष्ट करणे, मुसलमानांच्या सनातनीपणावर अप्रत्यक्षपणे आघात केल्यासारखेच होईल. हिंदूनी खऱ्या अर्थाने आधुनिकतेचा स्वीकार केला म्हणजे मुसलमानांनाही तो करावा लागेल. पण हा मनाचा समतोल हिंदू मनाने बाळगलेला नाही. ज्यांनी आधुनिकतेचा, खऱ्या न्यायाचा आणि बंधुभावाच्या शिकवणुकीचा स्वीकार केला आहे, त्यातील काही अप्रत्यक्षपणे त्या जातीवादाला खतपाणी घालण्याचे कार्य करतात.''[४]

''हमीद दलवाई यंनी हिंदू-मुस्लिम समाजासाठी नवा दृष्टीकोन दिला. हिंदू-मुस्लिम समाजाने त्यांना पाठिंबा दिला पाहिजे. हा पाठिंबा समान नागरी कायद्याच्या रूपाने दिला पाहिजे. सर्व लग्ने रजिस्टर झाली पाहिजेत. अनिष्ठेने वा बळजोरीने धर्मांतरे होता कामा नये, वयाच्या २१ वर्षांनंतरच विवाहितांच्या मूलांना ती वयात आल्यावर त्यांना जो हवा असेल तो धर्म लावण्याची मुभा असावी, अगोदर नाही. रस्ते रूंद करताना नागरिकत्वाच्या जबाबदाऱ्यांचा संबंध असेल तेथे सर्वांना सारखा न्याय

लावावा, दरगे आणि मारूती दोन्ही हलविले पाहिजेत. देशाच्या नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेतला जावा, सर्व धार्मिक मालमत्तेवर वक्फवर, देवळे, चर्च यांच्या उत्पन्नावर सरकारचे नियंत्रण असावे. हा पैसा समाज कल्याणासाठी खर्च करावा.''[५] अशी मागणी दलवाई यांची आहे. ही मागणी रास्तच म्हणावी लागेल. स्त्रियांना समानतेची वागणूक, गोषा पद्धती कायद्याने बंद करावी. गोहत्या बंदीचा प्रश्न देशाच्या शेती आणि आर्थिक विकासाच्या संदर्भात सोडविला जावा. कुटुंब नियोजन सर्वांना सक्तीचे व्हावे. हमीद दलवाई यांच्या या सर्व मागण्या रास्त आहेत. दलवाईंच्या मते वरील गोष्टी मुसलमानांना मान्य नसतील तर, ''त्यांना दुय्यम नागरिकत्व देण्यात यावे. त्यांचा (मुसलमानांचा) मतदानाचा अधिकार काढून घ्यावा. त्यांना समाजकल्याणाच्या कोणत्याही योजनांचा फायदा देण्याचे बंद करावे. ज्यांना शरीयत हवी असेल त्यांना शरीयतचा कायदा लावावा. म्हणजे अशा मुसलमानांनी चोरी केल्यास हात कापावा. खोटे बोलल्यास फटके लावले जावेत. व्यभिचार करणाऱ्या स्त्रीला रस्त्यात दगडांनी ठेचून मारावे.''[६] दलवाई यांच्या या सूचना कोणाही मानवतावादी व्यक्तीला मान्य होण्यासारख्या नाहीत. मुस्लिम समाजामध्ये सुधारणा करण्यासाठी, आधुनिकता आणण्यासाठी हा मार्ग म्हणजे रोगापेक्षा उपचार भयंकर असा प्रकार आहे. मुस्लिम समाजात बदल होणे गरजेचे आहे. परंतु हा परिवर्तनाचा मार्ग असू शकत नाही. कारण यामध्ये मानवतावादाचा अभाव आणि हिंसकतेचा दर्प आहे.

दलवाईंच्या मांडणीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे ते स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार करतात विशेषत: मुस्लिम स्त्रियांना पुरूषप्रधान दास्यातून मुक्त करण्याची त्यांची मोहिम होती. आजही मंडळाच्या विचाराने प्रेरित झालेले पुरोगामी स्त्री-पुरूष या भूमिकेवर सहमत आहेत. स्त्रीयांच्या हक्कासाठी अनेक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय संघटना कार्यरत आहेत.

हमीद दलवाई बुद्धीवादी होते, धर्मचिकित्सा, धर्मनिरपेक्ष राष्ट्रीय ऐक्याचे समर्थक होते. लोकशाही व भारतीय संविधानावर त्यांचा संपूर्ण विश्वास होता. मुलतत्ववाद, जमातवादाचे कट्टर विरोधक होते. दलवाई यांना मुस्लिम समाजावर टीका करूनही बदल आणता येईल असा विश्वास होता. इस्लामच्या धर्मचिकित्सेशिवाय मुस्लिम समाजात बदल घडणार नाहीत अशी त्यांची भूमिका होती. भारतीय समाजामध्ये विविधतेतून संमिश्रणातून राष्ट्रीय ऐक्य निर्माण व्हावे असे त्यांना वाटे. पुरोगामीत्व, बुद्धीप्रामान्यवाद हे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये दलवाई यांच्या लिखानामध्ये होते. "पृथ्वी सुर्याभोवती फिरते हे म्हणणाऱ्या कोपर्निकस, गॅलिलिओ आदी शास्त्रज्ञांचा युरोपमध्ये छळ झाला. कारण त्यांचे संशोधन बायबलविरोधी मानले गेले. सृष्टीच्या व्युत्पत्तीचे सिद्धांत पुराण, कुराण व बायबल येथे ईश्वरी अस्तित्व गृहीत धरून आलेले आहेत. परंतु आधुनिक विज्ञान असे उत्पत्तिशास्त्र मान्य करीत नसतानाही कट्टरवादी व मुलतत्ववादी मात्र अट्टाहासाने शब्दप्रामाण्याची कास धरतात. शब्दप्रामाण्याऐवजी प्रयोगशीलतेचा आधार प्रबोधनासाठी आवश्यक आहे. इतिहास, परंपरा आदीबाबतची विलक्षण वृत्ती हे प्रबोधन घडवते आणि आत्मटीकेमुळे ते काम अधिक सोपे होते. आत्मटीकेबरोबरच धर्मचिकित्सा तितकीच महत्त्वाची आहे. जोपर्यंत मानवाला पूर्ण अधिकार दिला जात नाही व त्याचे भाग्य शब्दप्रमाण्याच्या खुंटीवर अडकविले जाते तोपर्यंत धर्मचिकित्सा अवघड आहे. याचा विचार आधुनिक मनाने करण्याची गरज आहे."[७] मुस्लिम समुदाय, कुरान, हादीस शरीयत इत्यादीच्या मूळ शब्दांनाच चिकटला आहे. शब्दांना चिकटून न बसता त्याकडे शास्त्रीय दृष्टीकोनातून पाहणे गरजेचे आहे. कारण शरियत कायदे ज्या त्या परिस्थितीमध्ये समाजाच्या गरजेसाठी मनुष्यनिर्मित न्यायशास्त्र आहे. दलवाई यांचा मुस्लिम समाजात ही चिकित्सक वृत्ती जोपासण्याचा मानस होता. हमीद दलवाई यांचे हे महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणावे लागेल. इस्लाममध्ये धर्मचिकित्सेचा पाया हमीद दलवाई यांनी घातला. त्यांच्या मते "मुसलमानांना चिकित्सेचा अंगीकार करायला लावणे हे काम इतके मोठे आणि कठीण आहे की,

कोणीही एक माणूस त्याला पुरा पडणार नाही याची मला जाणीव आहे. पण म्हणून या समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने या कामाचे महत्त्व किती आहे हे ओळखणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने हे काम हाती घेतले पाहिजे. मी माझ्या अल्पकुवतीनुसार या कामाला वाहून घेतले आहे. हाच माझा लढा आहे आणि मुसलमान म्हणून मी तो लढवणार आहे.'[८] हमीद दलवाई यांना मुस्लिम समाजाला आधुनिकतावादी बनविण्याची तळमळ याठिकाणी दिसून येते. मुस्लिम समाजामध्ये धर्मचिकित्सेचा पाया घालण्याची गरज दलवाई यांना वाटत होती. मुस्लिम जातीवादाला नष्ट करून त्यांना अधिक धर्मनिरपेक्ष बनविणे ही भूमिका त्यांची होती ते म्हणतात "मुस्लिम समाजातील धर्मांतर्गत सुधारणेबरोबरच आर्थिक व शैक्षणिक विकास व सामाजिक सुधारणा घडवून आणून मुस्लिम समाजाला सांप्रदायिकतेच्या व अंध धर्मप्रामाण्यवादाच्या जोखडातून मुक्त करण्याची कलोचित निकड आहे. आधुनिक लोकशाही समाजवादी मुल्ये व धर्मातीत ईहवाद यांच्या मदतीनेच ते शक्य व्हावे."[९]

अर्थात दलवाई यांची एकुण मांडणी बुद्धीप्रामाण्यवादी होती. धर्मनिरपेक्षता, राष्ट्रीय एकात्मता, स्त्रीपुरूष समानता, संविधानामध्ये विश्वास, घटनात्मक मार्गाने सर्व प्रश्नांची सोडवणूक करणे इत्यादी घटक त्यांच्या विचारात अग्रस्थानी होते. धर्माकडे बघण्याचा त्यांचा दृष्टीकोन वैज्ञानिक होता. दलवाई शब्दप्रमाण्यामध्ये स्वत:ला कैद करू इच्छित नव्हते. एकूणच दलवाई यांनी एक नवा दृष्टीकोन दिलेला आहे. परंतु दलवाई यांचे सर्वच विचार परिपूर्ण होते असे म्हणता येत नाही. ज्या कालखंडात ज्या परिस्थितीमध्ये विचारांचा जन्म होतो. त्या प्राप्त परिस्थितीचा प्रभाव विचारांवर असतो. त्यातल्या त्यात दलवाई वादग्रस्त विचारवंत ठरले. कारण त्यांच्यावर अनेक बाजूने टीका झाली. विचारांमध्ये मतभेद होत असतात या मतभेदातूनच चिरंतन अशा दृष्टीकोनाचा जन्म होतो. म्हणून दलवाई यांच्या विचारावर होणाऱ्या टीका व विरोधी मतप्रवाहांना जाणून घेणे गरजेचे आहे.

**टीकात्मक विवेचन :**

हमीद दलवाई यांनी हिंदू-मुस्लिम या दोन्ही समाजातील धर्मांध शक्तीवर आपल्या विचाराने प्रहार केला. समाज परिवर्तक किंवा पुरोगामी विचारवंतास प्रतिगामी विचारप्रवाहातून काल ही विरोध झालेला आहे, आणि तो आजही कायम आहे. पारंपारिक समाज नव्या बदलाला सहजासहजी तयार नसतो. जुने सर्वच श्रेष्ठ नवे सर्व कुचकामी अशी त्या वर्गाची धारणा असते. कालबाह्य गोष्टींच्या पुनरूज्जीवन करण्यात असा वर्ग गुंतलेला असतो. बदलत्या भूमिकांचे आकलन त्यास लवकर होत नाही. म्हणून अशा वर्गाला जागे करण्याचे काम करावे लागते, दलवाईंनी तेच केले.

हमीद दलवाई यांच्यावर होणाऱ्या टीकाकारांमध्ये दोन मतप्रवाह आहेत १) दलवाई हे इस्लाम विरोधी आहेत असे मुस्लिम जमातवादी त्यांच्यावर टीका करतात. २) दुसऱ्या गटात दलवाई यांचा एजंडा (कार्यक्रम) योग्य आहे परंतु मार्ग चुकीचा आहे अशी टीका करणारा वर्ग आहे. त्यामध्ये प्रा. फकरूद्दीन बेन्नुर, सय्यद भाई, अब्दुल कादर मुकादम, रजिया पटेल आदी विचारवंताचा समावेश करता येईल. पहिला टीकाकारवर्ग हा अनाठायी टीका करणारा वर्ग आहे. तर दुसऱ्या गटात केवळ वैचारिक मतभेद आहेत. म्हणून हमीद दलवाई यांच्या विचारावर होणाऱ्या टीकांना जाणून घेण्यासाठी या दोन्ही मतप्रवाहांचा आढावा घ्यावा लागेल.

पहिला टीकाकार गट मुस्लिम जमातवाद्यांचा सनातनी लोकांचे आहे. हमीद दलवाई यांनी मुस्लिम राजकारणावर टीका केली. त्यामुळे मुस्लिम जातीवादी चिडले जातीवादी नेते त्यांना "इस्लामचा विरोधक, काफिर, हिंदुंचा एजंट वगैरे विशेषणे लावून त्यांच्या बदनामीची मोहिमच आखली. धमक्या व त्यांच्यावर हल्ल्याचे प्रयत्नही झाले. त्यांच्या मृत्यूनंतरही पुणे व मुंबई महापालिकेत मुस्लिम नगरसेवकांनी दलवाईंना श्रद्धांजली वाहण्यास विरोध केला."[१०] हमीद दलवाई धर्म ही खाजगी बाब समजत. धर्म आणि राजकारण या दोहोंची सरमिसळ त्यांना मान्य नव्हती. परंतु मुस्लिम

जमातवादी धर्म व राजकारणामध्ये द्वैत मान्य करीत नाहीत. त्यामुळे जमातवादी त्यांना इस्लामचा शत्रू म्हणून हेटाळणी करतात. दलवाई स्वत: नास्तिक होते. मुस्लिम समाजाने नास्तिक व्हावे असा त्यांचा आग्रह नव्हता. धर्माविषयी, ईश्वराविषयीची त्यांची भूमिका व्यक्तीगत होती. आपली नास्तिकता मंडळाच्या कार्यकर्त्यांवर आणि इतरांवर त्यांनी कधी लादण्याचा प्रयत्न केला नाही. तरीही मुस्लिम जमातवादी त्यांनी स्थापन केलेल्या मुस्लिम सत्यशोधक मंडळास नास्तिकांची चळवळ म्हणून टीका करतात.

हमीद दलवाईंनी इस्लामची चिकित्सा केली. इस्लामशी निगडीत कालबाह्य प्रथा, परंपरा टाकून देण्याचे समाजाला आवाहन केले. मुस्लिम जातीवादाला संपविण्यासाठी इस्लामी परंपरांची आणि इस्लामची चिकित्सा केली पाहीजे असे दलवाईंनी स्पष्ट केले. ''मुस्लिम सनातनी यामुळे गांगरले. त्याना हा हल्ला जिव्हारी झोंबला. हिंदू अंतर्मुख बनले. कडवे सनातनी त्यांच्यावर टीका करू लागले. हिंदूंचा एजंट, अस्तनीतला निखारा, काफीर, जनसंघी अशी शेलकी विशेषणे त्यांना लावली जावू लागली.''[११]

मुस्लिम जमातवादी इस्लामला परिपूर्ण समाज मानतात. कुराण हा ईश्वरीय ग्रंथ असून त्यामध्ये बदल करण्याचा मनुष्याला अधिकार नाही. 'शरियत' हा कुराणाचाच भाग आहे. असे मुस्लिम धर्मांध मंडळी मानतात. या मंडळींना समाजासाठी बनविलेले नीतीनियम किंवा न्यायशास्त्रे आणि धर्म या दोहोतला अर्थ उमगलेला नसतो. धर्मग्रंथाच्या शब्दांना ते कवटाळून बसतात. धर्माकडे बघण्याचा पारंपारिक दृष्टीकोन बदलण्यास ते तयार नसतात. धर्मचिकित्सेला ही मंडळी तयार होत नाहीत. जुन्या, भूरसटलेल्या कालबाह्य प्रथांचे पुनरूज्जीवन करण्यात ही मंडळी सतत गुंतलेली असतात. परिणामी या जमातवादी मंडळींच्या प्रतिगामी भूमिकेमूळे समाजाचा विकास खुंटतो. जमातवाद फोफावतो. त्यातून जातीय दंगली घडतात. म्हणून दलवाई यांनी या जमातवादावर कडक शब्दात टीका केली. त्यामुळे जमातवादी चिडले व दलवाईंवर टीका करून दलवाईंची प्रतिमा कलंकित करण्याचा प्रयत्न केला.

जमातवादी मुसलमान नेहमी उर्दूही मुसलमानांची भाषा आहे. मदरसा शिक्षण उर्दूमध्ये दिले जाते. भारतीय भाषा उर्दूने चांगल्या साहित्याची निर्मिती केली. साहित्य मनुष्याला जगण्याची उर्मी देते. म्हणून उर्दूचा विकास झाला पाहिजे. परंतु आजच्या काळात इंग्रजीही जागतिक भाषा बनलेली आहे. जग अधिक जवळ आलेले आहे. उर्दू ही मुस्लिमांची भाषा मुळात नाही. विशेषत: उर्दू ही उत्तर भारतीयांची भाषा आहे. दलवाई महाराष्ट्रातील मातृभाषा मराठी आहे असे सांगतात. त्यांच्या मते "गुजराथी मातृभाषा सांगणारा माणूस आपण गुजराथेतून महाराष्ट्रात आलो असे मानतो, म्हणून गुजराथी मातृभाषा सांगूनही तो भारतीय भारतातच राहत असतो आणि भारतात त्याच्या भाषेचा प्रांत असतो. मुसलमानांनी काय मानावे? आपण महाराष्ट्रात कोणत्या प्रांतातून आलो म्हणून समजावे? एक तर त्यांनी असे मानले पाहिजे की आपण इराण, अफगाणिस्तान, अरबस्तान, तुर्कस्तान येथून भारतात आलो. म्हणजे त्यांनी स्वत:ला भारतीयेत्तर व विदेशी नागरिक मानले पाहिजे. नाहीतर मुसलमानांनी असे म्हटले पाहिजे की आम्ही मूळचे इथलेच आहोत, याच प्रांतातले आहोत म्हणून हीच आमची मातृभाषा आहे. कुणी मुसलमान जर मी कानडी आहे, मुळात मी तेलगू आहे म्हणुन माझी मातृभाषा तेलगू अगर कानडी आहे, असे म्हणत असेल तर ते मी मान्य करण्यास तयार आहे. पण मी मुसलमान आहे म्हणून माझी मातृभाषा उर्दू आहे, हे समीकरण मान्य कसे करायचे?"[१२] दलवाई यांची तर्कशुद्ध विचार करण्याची क्षमता होती मराठी विषयीचा त्यांचा आग्रह विशिष्ट असा होता. त्यामुळे उर्दू समर्थक सनातनी मंडळीनी त्यांच्यावर टीका केली.

जमातवादी मुस्लिम जमातवादी मंडळी दलवाईंवर टीका करत असताना बुद्धी व तर्काचा आधार घेताना दिसत नाहीत. बहुतांशी त्यांच्या टीका रंजक आणि अनाठायी आहेत. प्रतिगामी वृत्तीचा त्यामध्ये दर्प आहे. मुस्लिम समाजाला उलट दिशेने वाटचाल करावयास लावणारा प्रवाह त्यामध्ये आहे. हिंदू कोड बील पास करणाऱ्या पंडीत नेहरू

यांच्यावरही हिंदू सनातन्यांनी टीका केली. त्यामध्ये तथाकथित पुरोगामी उच्चशिक्षितही होते. म्हणून नेहरूंचा निर्णय चुकीचा होता असे म्हणता येत नाही कारण समाजामध्ये परिवर्तन घडवून आणणाऱ्या प्रत्येक समाज सुधारकास समाजातील सनातनी, प्रतिगामी मंडळींना टीका सहन करावी लागते. त्यामध्ये कोणीच अपवाद ठरू शकत नाही.

हमीद दलवाईंवर टीका करणारा दुसरा वर्ग बुद्धीजीवींचा आहे. त्यांचे म्हणणे असे की, दलवाई यांचा एजंडा योग्य आहे. प्रागतिक आहे. परंतु त्यांची पद्धत हिंसक व चुकीची आहे. दलवाईंची समाज प्रबोधनाची पद्धत विध्वंसक आहे. दलवाई मुस्लिम समाजाला बरोबर घेवून जाण्यापेक्षा त्यांच्यावर कडक टीका करून त्यांच्यामध्ये सुधारणांची अपेक्षा बाळगत आहेत ही त्यांची पद्धत चुकीची आहे. त्यांच्या सुधारणांच्या कार्यक्रमाला बहुतांश मुस्लिम समाजाचा पाठींबा नाही. मुस्लिम समाजात निर्माण झालेल्या प्रश्नांची सहानुभूतीपूर्वक चिकित्सा करण्यापेक्षा त्यांच्यावर जास्त कडक टीका करतात. त्यामुळे ते मुसलमानापेक्षा हिंदूत्ववाद्यामध्ये प्रिय आहेत. त्यांच्या लिखानाचा आधार घेवून हिंदुत्ववादी मुस्लिम समाजावर टीका करतात अशी टीका या गटामधून होताना दिसते.

अब्दुल कादर मुकादम यांच्या मते ''मुस्लिम सत्यशोधक समाजामध्ये दाखल झाल्यापासून निदान सुरूवातीच्या काळात एक गोष्ट प्रकर्षाने माझ्या ध्यानात आली. मुस्लिम समाजाविषयी प्रामाणिक आस्था असणाऱ्या व या समाजाची प्रगती व्हावी म्हणून प्रयत्न करणाऱ्या ए. बी. शहा, नरहर कुरूंदकर, हमीद दलवाई, रा. भि. जोशी अशा अनेक विचारवंतानी इस्लामची चिकित्सा करताना ती इस्लाममधील हिंसेच्या, युद्धाच्या वा असहिष्णुतेच्या परंपरा आणि शरीयतविषयी मुसलमानांची तितकेच कर्मठ आणि आग्रही विरोधाची भूमिका एवढ्या मुद्यांपुरतीच मर्यादित ठेवली. एका पाश्चात्य विद्वानाने तर असे म्हटले आहे की, Islam reformed is Islam no more मुस्लिम समाजाविषयी असणाऱ्या विद्वानांनी इस्लामचे राजकीय स्वरूप व नकारात्मक भूमिका

घेऊन चिकित्सा केली.''[१३] ते पुढे म्हणतात, ''इस्लामची अशी चिकित्सा बरोबर आहे परंतु ती अपुरी आहे. त्यामुळे इस्लामचे खरे स्वरूप पुढे येत नाही. धर्माची चिकित्सा म्हणजे धर्मातील केवळ दोष दाखवून देणे नव्हे. तर त्यातील कालबाह्य काय आणि कालातीत व चिरंतन काय याचा सारासार विवेकाने अभ्यास करणे म्हणजे धर्म चिकित्सा.''[१४] दलवाई यांनी मुस्लिम समाजामध्ये आधुनिकता आणण्यासाठी जे प्रयत्न केले स्वातंत्र्य, गोहत्यासंबंधीचा प्रश्न भारताच्या शेतीच्या आर्थिक विकासाच्या संबंधी सोडवावा. परदा पद्धती, कुंटुंबनियोजना बद्दलची भूमिका रास्त आहे परंतु ज्यांना या सुधारणा मान्य नाहीत अशा मुस्लिमांना ''दुय्यम नागरिकत्व द्यावे, मतदानाचा हक्क काढून घ्यावा, शरियतचा कायदा लावावा, व्यभिचार करणाऱ्या स्त्रीला शरीयतनुसार दगडानी ठेचावे, चोरी करणाऱ्याचे हात कापावे. ज्या मुस्लिमांना शरीयत कायदे हवे आहेत त्यांना संपूर्ण शरियत कायदे लागू करावे.''[१५] अशी भूमिका दलवाई यांनी घेतली.

मुस्लिम समाजातील ज्या लोकांना केवळ शरियत कायद्यानुसार समाजजीवनाचे नियंत्रण व्हावे असे वाटते. ज्यांना समान नागरी कायदा नको आहे तसेच बहुपत्नीत्व, जुबानी तलाक, परदा पद्धती हवी आहे. ज्यांना या मध्ये सुधारणा नको आहेत अशांना मध्ययुगीन शरियत लागू करावी. त्यांना दुय्यम नागरिकत्व द्यावे. शरियतमध्ये जे पशुतुल्य अशा शिक्षांचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. तशाच शिक्षा द्याव्या अशी टोकाची भूमिका दलवाई मांडतात. डॉ. भा. ल. भोळे दलवाई यांच्या या भूमिकेस सहमत होणे शक्य नाही असे म्हणतात. कारण या विचारात हिंसेचा दर्प व मानवतावादाचा संपूर्ण अभाव आहे. समाज प्रबोधन आणि सुधारणेचा हा मार्ग चुकीचा आहे असे त्यांचे मत आहे समाजाला सक्तीने पुरोगामी करता येत नाही. समाजाचा विश्वास संपादन करत अस्थेवाहीकरित्या सुधारणा करणे गरजेचे असते.

असगर अली इंजिनियर यांच्या मते "हमीद दलवाई यांनी इस्लामचा सखोल अभ्यास केलेला नाही. मुस्लिम दररोजच्या जीवनामध्ये ज्या समस्यांना (आर्थिक स्वरूपाच्या) सामोरे जातात त्याकडे त्यांनी दुर्लक्ष केलेले आहे. त्यांचा मुस्लिम हे जन्मजात किंवा हाडाचे मुलतत्ववादी आहेत असा प्राथमिक विश्वास आहे. पारंपारिकता आणि विक्षिप्तपणा (Abscurutism) केवळ धर्मातून येत नसून तो भौतिक परिस्थिती आणि मानसिक संमिश्रणातून येतो हे मानण्यास दलवाई तयार नाहीत."[१६] अर्थात असगर अली इंजिनियर यांना हमीद दलवाई इस्लामचे गाढे अभ्यासक नव्हते. त्यांनी संपूर्ण मुस्लिम समाज हा कमालीचा कर्मठ मुलतत्ववादी असतो या दृष्टीकोनातूनच विचार मांडलेले आहेत. त्यांनी मुस्लिम समाजाच्या आर्थिक समस्याकडे दुर्लक्ष केल्याचे दिसते. अर्थात असगर अली इंजिनियर यांना असे म्हणावयाचे होते की, पारंपारिकता आणि विक्षिप्तपणा हा केवळ धर्मातून येत नाही तो भौतिक, मानसिक संमिश्रणातून येतो. हमीद दलवाई यांचा दृष्टीकोन याबददल चुकीचा आहे अशी टीका ते करतात.

हमीद दलवाई मुस्लिम समाज जर जन्मताच मुलतत्ववादी असतो असे म्हणत असतील तर त्यांची ही भूमिका चुकीची आहे. धर्माची निश्चित अशी तत्वे असतात. त्यास धर्माची मुलभूत तत्वे असे आपण म्हणू शकतो. धर्म मग तो कोणताही असो. मुळात धर्मामध्ये कोणत्याच वाईट शिकवणी नाहीत. परंतू धर्माच्या नावाने अधर्म माजविण्यात आलेला आहे. मग तो मार्ग धर्माचा चुकीचा अर्थ सांगण्यातून झालेला असो अथवा अन्य कोणताही मार्ग त्यास आपण खरा धर्म म्हणूच शकत नाही. कोणताही धर्म व्यक्तीच्या त्याच्या जन्मापासून मुलतत्ववादी आणि सनातनी वृत्ती जोपासण्यात प्रेरणा देत नाही तर व्यक्तीमध्ये असे भ्रम उत्पन्न करणाऱ्या ज्या समाजात असताता त्यांच्याकडून हे कार्य केले जाते.

फक्रुद्दीन बेन्नुर हमीद दलवाई यांची मांडणी पूर्वग्रहदूषित आहे असे मांडतात. संघपरिवार प्रणित इतिहास लेखनाच्या आधारे त्यांची मांडणी आहे. त्यांना उर्दू व

इस्लामचा गाढा अभ्यास नव्हता. त्यांच्या मते "वस्तुनिष्ठ अभ्यासकाकडून भारताच्या राष्ट्रबांधणीच्या प्रक्रियेत नेमके काय चुकले याचा शोध घेण्याचा प्रयत्न चालू आहे. सुशिक्षित उदारमतवादी वर्ग मुस्लिम समाजाला 'राष्ट्रीय प्रवाहात' सामिल व्हा असे आवाहन करू लागला. मुस्लिम बुद्धीवंतानी दिल्ली, अलिगड, मुंबई सारख्या शहरातून मेळावे घेवून मुस्लिम पुढारी आणि उलेमा यांच्या धर्मवादी आणि भावनिक राजकारणावर हल्ला चढविला. स्वातंत्र्योत्तर भारतातील मुस्लिम समाजाचा विचार खऱ्या अर्थाने राष्ट्रीय आणि समान भूमिकेतून झालेला नाही. अखिल भारतीय पातळीवरील बीपीनचंद्र रोमिला थापर, प्रा. पण्णीकर, डॉ. शाकीर, असगर अली इंजिनियर, मुशिरूल हसन वगैरे काही मंडळी सोडली तर मुस्लिमांचा विचार यांत्रिक पद्धतीनेच केला गेला आहे. जातीय दंगली व हिंदू-मुस्लिम संघर्षाच्या संदर्भात मुस्लिमांचा विचार करण्याची एक ठराविक पद्धती प्रस्थापित झालेली आहे. हिंदू पूरोगाम्यांची भूमिका साचेबंद आहे. आणि स्वतःला सुधारक व पुरोगामी म्हणविणारे मुस्लिम सुधारक देखील छुप्या आणि उघड्या हिंदुत्ववाद्यांच्या चष्म्यातूनच मुस्लिम प्रश्नांचा विचार करताना दिसून येतात.

दुसऱ्या प्रकारात मुस्लिमांचा विचार एक गठ्ठा मतांच्या संदर्भात केला जातो. मुस्लिम समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन ठरलेला आहे. त्यामध्ये भारतीय मुस्लिम एकसंघ असून तो विलक्षण धर्मवेडा आणि मुल्ला मौलवी यांच्या प्रभावाखाली असणारा आहे. हा समाज पूर्णपणे नागरी व इतर जाती-जमातीपासून फटकून वागणारा आहे. इस्लामची संस्कृती भारतीयत्वाला छेद देणारी आणि परकीय आहे. काहीजण त्यांना फाळणीचे गुन्हेगार म्हणून बघतात. काही त्यांना राष्ट्रद्रोही अल्पसंख्य समजतात. तर राजकारणाच्या बाबतीत मुस्लिम पासंग अल्पसंख्यांक असतात. ब्रिटिशकाळातील इतिहासकार आणि पाश्चिमात्य इतिहासकारांच्या इतिहास लेखनातून मुस्लिमांसंबंधी त्या दृष्टीकोनातून मते मांडण्यात आलेली आहेत. त्यामध्ये हमीद दलवाई यांचा समावेश

होतो.''[१७] अर्थात हमीद दलवाई यांची लिखानपद्धती या इतिहासाच्या आधारे आहे. असे डॉ. फक्रुद्दीन बेन्नुर यांना वाटते. हे मत रास्त वाटते कारण ब्रिटिशांनी किंवा पाश्चात्यांनी जे इतिहास लेखन केले ते भारतावर साम्राज्य टिकविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या हिंदू-मुस्लिम भेद नितीसाठी इतिहासाचे केलेले विकृतीकरण आहे. ही गोष्ट नाकारता येत नाही. ब्रिटिशांना साम्राज्य विस्तारासाठी भेदनिती अवलंबने गरजेचे होते. त्याशिवाय त्यांना भारतामध्ये साम्राज्य टिकविणेच शक्य नव्हते. १८५७ नंतर प्रामुख्याने ही भेदनीती प्रकर्षाने जाणवते. याचे विवेचन मागे प्रकरण तीन मध्ये आलेले आहे. सय्यद भाई पूणे, रजिया पटेल इत्यादी मुस्लिम प्रश्नाविषयी दलवाईंशी सहमत आहेत. परंतु दलवाई यांच्या संपूर्ण विचाराशी ते सहमत नाहीत. रजिया पटेल यांची मुस्लिम स्त्रीविषयक भूमिका उदार आहे. दलवाई यांनी स्त्री-पुरूष समानतेची घेतलेली भूमिका मान्य करतात. मुस्लिम स्त्रीयांच्या प्रश्नावर रजिया पटेल यांनी आंतरराष्ट्रीय परिषदांमधूनही अनेक समस्या मांडलेल्या आहेत.

मुस्लिम जमातवादी हमीद दलवाई यांना अस्तिनीतला निखारा, इस्लामचा शत्रू, हिंदूंचा हस्तक, तथाकथीत पुरोगामी नास्तिक अशी टीका करतात. हमीद दलवाई संपूर्ण मुस्लिम समाजाचा शत्रू आहे. इस्लामला नष्ट करण्याची त्यांची भूमिका आहे. हमीद दलवाई हा संघपरिवाराचे अपत्य आहे अशी भूमिका जमातवादी घेताना दिसतात. तर दुसऱ्या बाजूला हमीद दलवाई यांचा एजंडा कार्यक्रम बरोबर आहे असे म्हणणारी मंडळी आहेत. त्यामुळे असगर अली इंजिनियर, डॉ. फक्रुद्दीन बेन्नूर, अब्दुल कादर मुकादम, पुण्याच्या रजिया पटेल, इत्यादी विचारवंतांचा समावेश करता येईल. हमीद दलवाई यांचा एजंडा बरोबर आहे. त्यांनी हाताळलेले मुस्लिम स्त्रीविषयक प्रश्न ही योग्य आहेत. परंतु मुस्लिम समाज सुधारण्याची त्यांची पद्धत हिंसक व चुकीची आहे. हमीद दलवाईंनी ज्या कठोर शब्दात मुस्लिम समाजावर टीका केली ती चूकीची आहे असे या टीकाकारांचे मत आहे.

**हमीद दलवाई यांच्या विचारांची समकालीन प्रस्तुतता :**

कोणत्याही विचारप्रवाहाचा विचार केल्यास त्यामध्ये मतभेद होतात. प्रसंगी तीव्र टीकाही होतात परंतु केवळ टीका करण्यापेक्षा त्या विचारप्रवाहातील चिरंतनत्व आणि विचारवंतातील धष्ठेपणा शोधणे गरजेचे असते. हमीद दलवाई यांच्यामध्ये तो धष्ठेपणा आणि चिरंतनत्व होते. परंतू त्यांच्या ज्या अपेक्षेप्रमाणे या समाजाने बदलण्यास सांगीतले त्या अपेक्षेने मुस्लिम समाज तितका बदलला नाही. परंतु मुस्लिम समाजाला अंर्तमुख होऊन विचार करण्यास दलवाई यांनी प्रवृत्त केले.

स्वातंत्र्योत्तर कालखंडात आजमितीपर्यंत हिंदू-मुस्लिम प्रश्न तीव्र बनले. दोन्ही समाजातील धर्मांध शक्ती या सर्व घटनाक्रमामागे कारणीभूत आहेत. भारतीय संविधानामध्ये धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाचा स्वीकार केला. त्यान्वये भारत हे धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून घोषित करण्यात आले. परंतु भारताच्या धर्मनिरपेक्ष समाजव्यवस्थेला आणि राष्ट्रीय एकात्मतेला सतत तडे गेले. हिंदू-मुस्लिम जातीवादी संघटना अलिकडच्या काळात कमालीचा जातीद्वेष पसरवित आहेत. हमीद दलवाई यांच्या मते जमातवाद अल्पसंख्यांकाचा असो अथवा बहुसंख्यांकाचा दोन्ही प्रकारचा जमातवाद तितकाच घातक आहे असे ते म्हणतात. समकालीन परिस्थितीमध्ये हिंदू-मुस्लिम ऐक्याची आणि गांधीप्रणित अहिंसेच्या तत्वाची कधी नव्हे तितकी गरज बनलेली आहे. हमीद दलवाई यांच्या धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची गरज आहे. जमातवाद घातक असतो. राष्ट्रीय विकासाच्या मार्गामध्ये तो मोठा अडथळा आहे. हमीद दलवाई यांनी हिंदू-मुस्लिम जमातवादी वृत्तीला आळा बसावा म्हणून विचार मांडले ते आज गरजेचे आहेत.

"राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही जहाल हिंदुत्ववादी संघटना १९२५ साली डॉ. हेडगेवार यांनी स्थापन केली. त्याचा मुख्य उद्देश धार्मिक आणि सांस्कृतिक राष्ट्रवादाचा प्रसार करून हिंदू राष्ट्राची निर्मिती करणे हे आहे. 'हिंदू राष्ट्र ही पूर्णत: धर्मनिरपेक्ष लोकशाहीला विरोधी संकल्पना आहे. त्यांच्या मतानुसार धर्मनिरपेक्षता ही परदेशी/

पाश्चात्य संकल्पना आहे म्हणून ती स्वीकारायला नको. राष्ट्रीय स्वयंसेवक संघास धर्मनिरपेक्ष लोकशाही भारताची संकल्पना मान्य नाही. त्यांना बलशाली हिंदू राष्ट्रावर विश्वास आहे.''[१८] या आधारावर हिंदुत्वाची मांडणी झाली मुस्लिम समाजाबद्दलची हिंदुत्वाची मांडणी मागे आलेली आहे. मध्ययुगीन इतिहासाचे विकृतीकरण करून हिंदू समाजात मुस्लिम समाजाविषयी अनेक चुकीचे भ्रम हिंदूत्ववादी संघटनांनी केले. त्यामध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, हिंदू साधूंची संतसभा, मराठा महासंघ, शिवसेना इत्यादी हिंदुत्वनिष्ठांनी आघाडी घेतली. ''१९७७ पासून फार मोठ्या प्रमाणात राजकारणासाठी धर्माचा गैरवापर सुरू झाला.''[१९] यातूनच मंडल आयोगाला विरोध झाला. आणि बाबरी मशीद रामजन्मभूमीचा प्रश्न उपस्थित केला गेला. हा प्रश्न ''भारतीय इतिहासाचे विकृतीकरण, ब्रिटिश भेदनीती आणि धर्मवाद्यांचे राजकारण यातून उभा राहिला.''[२०] ६ डिसेंबर १९९२ रोजी हिंदुत्ववादी कारसेवकांनी बाबरी मशीद जमीनदोस्त केली. १९९२ नंतर देशात मोठ्या प्रमाणात जातीय दंगली झाल्या ज्यामध्ये हिंदू-मुस्लिम दोन्ही समुदायाचे मोठे नुकसान झाले. धर्मांध शक्तीमुळे भारतीय राष्ट्रीय एकात्मतेला धर्मनिरपेक्ष सांविधानिक चौकटीला तडा गेला. स्वत:ला धार्मिक आणि सहिष्णू समजण्याचे हे एक हिंसक कृत्य होते. त्यामध्ये मुस्लिम जातीवादी शक्तीही बऱ्याच अंशी कारणीभूत होत्या. त्याचबरोबर तथाकथित पुरोगामी आणि स्वत:ला धर्मनिरपेक्ष समजणाऱ्या राजीव गांधी सरकारचे हे अपयश होते. म्हणून हमीद दलवाई यांची भूमिका याठिकाणी रास्त वाटते. कारण कॉंग्रेसने मुस्लिम व हिंदू जमातवाद अप्रत्यक्षरित्या पोसलेला आहे.

डॉ. भा. ल. भोळे यांच्या मते विशिष्ट परधर्मीय समाजाला आपल्या सगळ्या प्रश्नांचे मूळ कारण बनविणे हा जमातवादी राजकारणाचा सतत प्रयत्न असतो. १९८४ च्या निवडणूकीनंतर भारतीय राजकारणात सांप्रदायिकतेचे स्तोम अतोनात वाढले. सुवर्ण मंदीरात लष्कर घुसवून हिंदू मतदारांना आपलेसे करण्याचे श्रीमती गांधींचे

राजकारण राजीव गांधींनी पुढे चालू ठेवले. शाहाबानो खटल्याच्या निकालाच्या विरोधात मुस्लिम प्रतिगामी शक्तीपुढे त्यांनी शरणागती पत्करली आणि त्यामुळे दुखावलेल्या हिंदू प्रतिगामी शक्तीचा अनुनय करण्यासाठी त्यांनी बाबरी मशिदीचे दरवाजे हिंदूंना खुले करून दिले. हिंदूंनी तेथे रामलल्लाची मूर्ती बसवून राममंदिराचे जमातवादी राजकारण मोठ्या प्रमाणावर सुरू केले. मुस्लिम अल्पसंख्यांकाच्या द्वेषावर आधारित हिंदुत्वाची सरशी १९९० नंतरच्या दशकात झपाट्याने झाली. १९९० च्या सप्टेंबर महिन्यात लालकृष्ण अडवाणी यांनी गुजरातेतील सोमनाथ मंदीरापासून अयोध्येपर्यंत रथयात्रा सुरू करून जमातवादाला चालना दिली.''[२१]

भारतामध्ये जातीय दंगलीस केवळ हिंदुच कारणीभूत नाहीत. मुस्लिम समाजामध्ये प्रतिगामीत्व आणि धर्मांधता वाढविण्यास आणि त्यांच्यामध्ये जमातवादी आणि हिंदूद्वेष पसरविण्यात मुस्लिम धर्मांध शक्तीची मजलही थोडी नाही. जमाते इस्लामी, तबलीक सारख्या धार्मिक पुनरूज्जीवनवादी चळवळी, जमाते उलेमा, सिमी, तामी मीलत जमाते इस्लामी, हिज्बुल मुजाहिद्दीन, अखिल भारतीय मुस्लिम कायदा बोर्ड, जमाते तुलबा, मजलीशे मशावरत इत्यादी संघटना कडून मुस्लिम जातीयतेला चालनाच दिली जाते. त्यामुळे वाढत्या जमातवादाला ज्याप्रमाणे हिंदु धर्मांधता जबाबदार आहे तीतकीच मुस्लिम धर्मांधताही जबाबदार आहे. हमीद दलवाई यांनी मुस्लिम जातीवादा विरूद्ध उठविलेला आवाज म्हणून चुकीचा नव्हता. आजही मुस्लिम समाजामध्ये प्रबोधनाची गरज बनून बसलेली आहे. शहाबानो खटला असो, समान नागरी कायदा असो अथवा धर्मचिकित्सेचा प्रश्न असो मुस्लिम समाजातील काही धर्ममार्तंड, उलेमा (धर्मगुरू) विरोध करताना दिसतात. मुस्लिम व्यक्तीगत कायद्या मध्ये बदल करण्याची मानसिकता आजही धर्मांध मंडळींची बनलेली नाही. हमीद दलवाई यांची मांडणी बुद्धीप्रामाण्यवादी होती. प्रा. सुहास पळशीकर यांच्या मते बऱ्याच वर्षापासून मुसलमानांमधल्या एका सुधारणावादी गटाने बहुपत्नीत्व आणि तोंडी तलाक या प्रश्नांना विरोध करण्याची भूमिका घेतली. हमीद दलवाई आणि त्यांचे सहकारी

बुद्धीवादी (rationalist) आणि ईहवादी भूमिकेतून पाहत होते. त्यामुळे त्यांना इस्लामविरोधी ठरविणे जमादवाद्यांना सहज शक्य झाले."[२२] हा विरोध आजही बऱ्याच अंशी कायम आहे. अलिकडेच घडलेल्या इमराना प्रकरणात उलेमांनी काढलेल्या फतव्यामुळे मुस्लिम स्त्री आजही व्यक्तीगत कायद्याच्या आधारे भरडली जाते म्हणून हमीद दलवाई यांच्या विचारांची प्रस्तुतता संपलेली नाही. गुजरातमध्ये घडलेल्या जातीय दंगली आणि राज्यकर्त्यांच्या पक्षपाती भूमिकेमुळे कमालीचा रक्तपात झाला. या सर्व घटना भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेस आणि धर्मनिरपेक्ष भारतीय समाजव्यवस्थेस घातक आहे.

हमीद दलवाई यांच्या विचारावर टीका होत असल्या तरी त्यांनी अवलंबलेला कार्यक्रम योग्य होता. परंतु मुसलमानांच्या स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्योत्तर राजकारणाबद्दल त्यांनी केलेली चिकित्सा एकांगी आहे. स्वतंत्र लढ्यामध्ये आणि राष्ट्रसभेमध्ये, मौलाना आझाद, खान अब्दुल गफारखान, बद्रुद्दीन तैय्यबजी, असे अनेक मुस्लिम नेते होते.

इत्यादी अनेक नेते स्वातंत्र्याच्या अपेक्षेने लढत होते हे विसरून चालणार नाही. मुस्लिम समाज हा पूर्णपणे जातीवादी नाही. मुस्लिम समाजाचा अभ्यास आज अनेक मंडळी आर्थिक आणि समाजिक घटक या दृष्टीकोनातून करत आहेत. हमीद दलवाईंनी मुस्लिम समाजाने राष्ट्रीय प्रवाहात सामील व्हावे असे आवाहन केले. याचा अर्थ मुस्लिम समाज राष्ट्रीय प्रवाहात नाही असा होतो. मुस्लिम समाज हा भारतीय राष्ट्रीय प्रवाहाचा एक अविभाज्य भाग आहे याकडे त्यांनी दुर्लक्ष केलेले आहे. मुस्लिम समाजातील काही लोक धर्मांध आहेत ही गोष्ट नाकारता येत नाहीत. परंतु मुस्लिम समाजातील जातीयतेची कारणे आर्थिक दारिद्र्य हे एक आहे. आर्थिक दारिद्र्य, कमालीची निरक्षरता, यामुळे मुस्लिम समाज धर्मगुरू, उलेमा यांच्याकडे वळतात उलेमा मंडळी धर्माचा चुकीचा अर्थ सांगून कमालीची अंधधर्मश्रद्धा जोपासतात त्यामुळे जमातवाद बळावतो.

हमीद दलवाई आणि त्यांनी स्थापन केलेल्या मुस्लिम सत्यशोधक मंडळाचे कार्य आजही उपयुक्त आहेत. मंडळाच्या माध्यमाने जुबानी तलाक, शरियत कायद्याबद्दल भूमिका, स्त्री-पुरूष समानतेचे समर्थन, समान नागरी कायद्याबद्दलची भूमिका, परदा पद्धती (गोषा) मुस्लिम स्त्रियांना हक्क बहाल करणारे आणि प्रागतिक आहेत. हमीद दलवाई यांचे धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाचे विचार महत्त्वाचे आहे. मुस्लिम समाजाने धर्माची वैज्ञानिक दृष्टीकोनातून चिकित्सेची परंपरा घालून घेतली पाहिजे. इत्यादी भूमिका स्वागतार्ह आहे. समकालीन भारतीय राजकारण आणि सामाजिक परिस्थितीकडे दृष्टीक्षेप टाकल्यानंतर वाढता हिंदू-मुस्लिम जमातवाद भारताची लोकशाही आणि सांविधानिक तत्वांना घातक आहे. हिंदूत्ववादी जमातवादाची आणि मुस्लिम जमातवादाचे वाढते हिंसक स्वरूप पाहिल्यास भारत जातीवादाच्या भयंकर अशा आव्हानांना सामोरा जात आहे. त्यामुळे भारतीय समाजव्यवस्थेला विकासाच्या प्रक्रियेत गतीशील करण्यासाठी आणि राजकीय स्थैर्य तसेच जातीय सलोखा निर्माण होण्यासाठी धर्मनिरपेक्षतेशिवाय तरणोपाय नाही. हे पुन्हा सिद्ध झालेले आहे. भारत-पाकिस्तान फाळणीने हिंदू-मुस्लिम समाज जास्त काय शिकलेला दिसत नाही. पाकिस्तानची फाळणी होवून बांग्लादेशाची निर्मिती झाल्यानंतर धर्म हा एक घटक राष्ट्रउभारणीसाठी अपूरा आहे हे हिंदू-मुस्लिम समाजातील सनातनी, धर्मांधांना पुन्हा सांगण्याची आज गरज बनलेली आहे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) दलवाई हमीद – 'राष्ट्रीय एकात्मता आणि भारतीय मुसलमान', साधना प्रकाशन, २००२, पुणे, पृ. क्र. १०.

२) डॉ. भोळे भा. ल. – 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर, जून २००३, पृ. क्र. ५५४.

३) मुकादम अ. का. – 'दास्तान भारतीय मुसलमानांची', प्रकाशन, बॉम्बे सर्वोदय फ्रेन्डशिप सेंटर, मुंबई, २०००, पृ. क्र. ३५.

४) डॉ. भोळे भा. ल. – 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर, जून २००३, पृ. क्र. ५४२.

५) उक्त – पृ. क्र. ५४४

६) उक्त – पृ. क्र. ५४४.

७) उक्त – पृ. क्र. १२, (प्रस्तावनेतून उद्धृत).

८) प्रकाशन, मुस्लिम सत्यशोधक मंडळ – 'मुस्लिम सत्यशोधक मंडळ दोन दशकांची वाटचाल', २२ मार्च १९८९, पृ. क्र. ०६.

९) उक्त – पृ. क्र. ०६.

१०) उक्त – पृ. क्र. १४.

११) उक्त – पृ. क्र. १६.

१२) मुनीर सय्यद (संपा.) 'मुस्लिम सत्यशोधक पत्रिका', प्रकाशन मुस्लिम सत्यशोधक मंडळ, जुलै १९७६ ते १९७७, पृ. क्र. ११.

१३) मुकादम अ. का. – 'दास्तान भारतीय मुसलमानांची', प्रकाशन, बॉम्बे सर्वोदय फ्रेन्डशिप सेंटर, मुंबई, २०००, (मनोगतातून उद्धृत)

१४) उक्त - ~~(मनोमतातून उद्धृत)~~

१५) डॉ. भोळे भा. ल. – 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर, जून २००३, पृ. क्र. ५४४.

१६) Dr. Kazi B. T. – 'A Study of the Muslim Satyashodhak Mandal' As a Social Reform Movement in Maharashtra, Ph.D. Thesis, Shivaji University, Kolhapur, Page No. 140

१७) डॉ. बेन्नुर एफ. एच. – 'भारतीय मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता', प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधनी, १९९५, अंक ५ व ६, पृ. क्र. २,३,४,५.

१८) Engineer Asghgar Ali – 'Indian Journal of Secularism', Huminist Review, Vol. No. 9, No. 1, April-June, 2005, Page No. 24.

१९) डॉ. बेन्नुर एफ. एच. – 'भारतीय मुस्लिमांची समाजरचना आणि मानसिकता', प्रबोधन प्रकाशन, समाजवादी प्रबोधनी, १९९५, अंक ५ व ६, पृ. क्र. ७६.

२०) उक्त – पृ. क्र. ५४.

२१) डॉ. भोळे भा. ल. – 'भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर, जून २००३, पृ. क्र. ६९.

२२) पळशिकर सुहास (लेख) – 'मुस्लिम समाजाची भरकटलेली उदाहरणे', परिवर्तनाचा वाटसरू, १६ ते ३१ जुलै २००५, पृ. क्र. १३.